जा.क्र.का.15/मुंबई शहर/च.क्षे.नि./दर/ ४
मूल्यांकन/परिपत्रक/ 512
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे-1
दि.23/05/2016.

परिपत्रक :-

**विषय :-** मुंबई शहरातील वार्षिक मूल्य दर तक्त्यामधील एक चटई क्षेत्र निर्देशांकाचे दरानुसार मूल्यांकन करणेबाबत.

मुंबई महानगरपालिका हद्दीमध्ये मुंबई शहर व मुंबई उपनगरामध्ये अनुक्रमे 1.33 व 1.0 चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे. तथापि, वार्षिक मूल्य दर तक्त्यातील जमीन दर हे एक चटई क्षेत्र निर्देशांकाचे दिले आहेत. याबाबतची स्पष्टता सन 2008 पर्यंतच्या वार्षिक मूल्य दर तक्त्यात नमूद करणेत येत होती. सन 2008 चे दर सन 2009 साठी कायम ठेवले होते. त्यानंतर सन 2010 पासून निर्गमित केलेल्या वार्षिक मूल्य दर तक्त्यामध्ये जमीन दर एक चटई क्षेत्र निर्देशांकाप्रमाणे असलेचे जरी नमूद करणेत येत नसले तरीही सदर दर 1.0 चटई क्षेत्र निर्देशांकाकरीताचेच आहेत.

मुंबई शहरामध्ये मूळ अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक 1.33 इतका आहे. त्यामुळे खरेदी दस्त प्रकरणी जमिनीचे मूल्य जमीन क्षेत्र x 1.33 x जमीन दर याप्रमाणे गुणाकार करुन परिगणित करणे आवश्यक आहे. वार्षिक मूल्य दर तक्त्यातील जमीन दर हे अनुज्ञेय 1.33 चटई क्षेत्र निर्देशांकाचे देणेत आले असलेचे समजून मूल्यांकन करताना काही प्रकरणी वरीलप्रमाणे मूल्य परिगणित केले नसलेचे निदर्शनास आले आहे.

सदर बाब योग्य नसून वरीलप्रमाणे मूल्य परिगणित करणेत यावे.

सदर परिपत्रकाची प्रत नोंदणी व मुद्रांक विभागाच्या www.igrmaharshtra.gov.in या संकेतस्थळावर publication या सदराखाली circulars या ठिकाणी उपलब्ध आहे.

सही/-
( डॉ.रामास्वामी एन.)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहितीसाठी सादर :-

1) मा.प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
2) मा.सचिव, (मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
3) मा.महालेखापाल (लेखापरिक्षा) - II, महाराष्ट्र, नागपूर.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :-

4) सहनोंदणी महानिरीक्षक, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
5) सहायक संचालक नगर रचना, मूल्यांकन,कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
6) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, (मुख्यालय), पुणे.
7) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (संगणक) पुणे.
   -/ सदर परिपत्रकाची प्रत विभागाच्या संकेतस्थळावर upload करणेबाबतची कार्यवाही करणेत यावी.
8) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/लातूर/अमरावती/नागपूर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
   -/ सदर परिपत्रकाची प्रत आपले अधिनस्त सर्व नोंदणी कार्यालयांना पुरविणेत यावी. तसेच सदर परिपत्रक त्यांना प्राप्त झाले असून, ते वाचलेबाबत (Read & acknowledge) त्यांच्या कार्यालयाचा अहवाल प्राप्त करुन घेऊन या कार्यालयास पाठविणेत यावा.
9) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
10) श्रीमती.निलीमा देसाई, NIC पुणे.

निर्गमित

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता